# ट्रॅक्टर उलटून दोन ठार, एक गंभीर



ब्राह्मणवाडा थडी मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि. 27 ) –** ब्राह्मणवाडा थडी मार्गावर ट्रॅक्टर उलटून चालकासह अन्य एकाचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना 27 ऑक्टोबर रोजी दुपारी 1.30 वाजताच्या सुमारास ब्राह्मणवाडा थडीजवळ घडला. या अपघातात चालक विशाल भास्करराव सांगोळे (31, रा. तळवेल) यांचा जागीच मृत्यू झाला तर प्रेमलाल कममू धुर्वे (35, लवादा) यांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर राम मादजी उईके (35) हे जखमी झाले आहे.

माहितीनुसार, तळवेल येथील हरीश बोंडे यांच्या मालकीचा ट्रॅक्टर रविवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास चांदूरबाजार तालुक्यातील ब्राह्मणवाडा थडी गावाजवळील दाभाडे फॅब्रिकेशनजवळ मुख्य रस्त्यावरून जात होता.दरम्यान अचानक चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर पलटी झाला. यामध्ये ट्रॅक्टर चालक विशाल भास्करराव सांगोळे याचा जागीच मृत्यू झाला. तर जखमी प्रेमलाल कममू धुर्वे यांचा उपचारादरम्यान रुग्णालयात मृत्यू झाला. या अपघातात राम उईके हे जखमी आहेत. त्यांच्यावर अमरावती येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे.

# प्रकाशाच्या उत्सवात वीजसुरक्षेची काळजी घ्या!

## महावितरणचे ग्राहकांना आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.27 )–**दिवाळी सण साजरा करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. सणाच्या कालावधीत विद्युत सजावट, रोषणाई तसेच फटाक्यांची आतषबाजी करताना वीजसुरक्षेची काळजी घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक वीज यंत्रणेसोबतच घरगुती रोषणाईच्या विद्युत उपकरणांपासून सावध रहावे. कोणत्याही प्रकारचा धोका न पत्करता वीजसुरक्षेची काळजी घेत दिवाळी सण साजरा करावे, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.



महावितरणची वीज यंत्रणा ही सार्वजनिक ठिकाणी आहे. यात वीजवाहिन्या, रोहित्र, फिडर पिलर आदी यंत्रणा उघड्यावर असल्याने फटाके फोडताना त्यापासून सुरक्षित अंतर ठेवावे. फटाक्यांच्या आतषबाजीत सार्वजनिक वीजयंत्रणेला आगीचा धोका निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. रोहित्र, फ्यूज पेट्या, फिडर पिलर, रिंग मेन युनिट जवळ फटाके फोडू नयेत किंवा त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा कचरा टाकू नये अथवा तो जाळू नये. वीज वाहिन्यांना स्पर्श होईल किंवा धोका निर्माण होईल असे रॉकेटसारखे फटाके वाहिन्यांखाली उडवू नयेत. मोकळ्या जागेतच फटाके उडवावेत. वीज यंत्रणेला आग लागल्यास, धोका निर्माण झाल्यास, वीज पुरवठा खंडित झाल्यास महावितरणच्या 24 तास सुरु असणाऱ्या कॉल सेंटरच्या 1800-212-3435 किंवा 1800-233-3435 किंवा 1912 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. दिवाळी साजरी करताना घरगुती विद्युत उपकरणांपासून देखील सावध राहावे. घराच्या किंवा इमारतीच्या रोषणाईसाठी दिव्यांची विद्युत माळ चांगल्या दर्जाची असल्याची खात्री करून घ्यावी. विद्युत माळेचे वायर, दिवे, सॉकेट दर्जेदार नसल्यास धोका निर्माण होऊ शकतो.

घर किंवा इमारतीचे अर्थिंग योग्य असल्याची तपासणी करावी. घराबाहेर आकाशकंदील लावताना तुटलेल्या वायरचा वापर टाळावा किंवा तुटलेली वायर चांगल्या दर्जाच्या इन्सुलेशन टेपने सुरक्षित करून घ्यावी. घरगुती उपकरणांसह विद्युत माळेपासून सुरक्षित अंतरावर तेलाच्या वातीचे दिवे लावावेत. विद्युत सॉकेटवर अधिकचा भर टाकू नये.

### आकाश कंदिल व लायटींग लावताना काळजी घ्या!

आकाश कंदिल किंवा दिव्यांच्या विद्युत माळेसाठी(लायटींग) श्री पीनचा वापर न करता वायर्स थेट प्लगच्या छिद्रात आगपेटीच्या काड्यांच्या साह्याने खोचले जातात. त्यामुळे त्या प्लगमध्ये स्पार्कींग होऊन आग लागण्याची शक्यता असते. गॅलरीमधील लोखंडी जाळी किंवा घराचा लोखंडी जिना किंवा इतर कोणत्याही लोखंडी वस्तूपासून विद्युत दिव्यांची व आकाश कंदिलाची वायर दूर ठेवावी. ही वायर एकसंध असावी. तुटलेली किंवा सेलो टेपने जोडलेली नाही याची खात्री करून घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# खासगी बस प्रवाशाची 87 लाख रुपये चोरी करणाऱ्या दोघांना राजस्थानातून अटक

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 27 ) –** खासगी बस प्रवाशाची 87 लाख रुपयांची रक्कम चोरी करणार्या दोन जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना राजस्थानातून अटक केली. जितेंद्र सिंग सुमेरसिंग राठोड (31 वर्ष रा. सावला मंदीर जवळ आहोर जि. जालोर, राजस्थान ह.मु.मोकलसर, ता.शिवाना, जि. बारमेड, राज्य राजस्थान) व अजितसिंग गुमानसिंग (27, रा. गोथरा जि. नागोर, ह.मु. जोधपुर) अशी आरोपींची नावे असून, त्यांच्या ताब्यातून वाहन व रक्कम असा एकुण 7 लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जितेंद्रकुमार चुन्नीलालकुमार (32, रा. आंगडीया कुरीयर सर्वीस, रा. जावल रोड पोसालिया ता.शिवगंज जि.सिरोही राज्य राजस्थान ह.मु. सराफा बाजार, अमरावती) हे 10 ऑक्टोबर रोजी रात्री 87 हजाराची रोख घेऊन खासगी बसने प्रवास करीत होते. दरम्यान लोणी हद्दीतील हॉटेल तंदूर नाईटस येथे बस थांबल्यानंतर ते लघुशंकेकरीता गेले आणि त्याचवेळी त्यांची बॅग चोराना लंपास केली. त्यांच्या तक्रारीवरून लोणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणाच्या तपासात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने राजस्थान राज्यातुन आरोपींना अटक केली आहे.

# बच्चू कडू आज दाखल करणार नामांकन अर्ज

- हजारोच्या संख्येने प्रहार कार्यकर्ते नामांकन रॅलीसाठी सज्ज
- सलग पाचव्यांदा आमदार होणार, बच्चू कडूंचा निर्धार



*महासागर प्रतिनिधी*

*अचलपूर,( दि.27 )–अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या तसेच तिसरी आघाडी परिवर्तन महारॅलीचे उमेदवार आमदार बच्चू कडू यांचा नामांकन अर्ज उद्या दि.28 ऑक्टोबर रोजी भरणार आहे. अचलपूर गांधी पुल येथून सकाळी 11:30 वाजता ते उपविभागीय कार्यालय अचलपूर येथे भव्य पायदळ रॅली काढून बच्चू कडू प्रचंड शक्तिप्रदर्शनात नामांकन अर्ज दाखल करणार आहे.*

अचलपूर, चांदूरबाजार तालुक्यातील हजारो कार्यकर्ते या महारॅलीसाठी सक्रिय झाले आहे.

प्रहार चे दमदार आमदार म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले बच्चू कडू यांनी अचलपूर विधानसभेचे सलग 20 वर्षापासून प्रतिनिधित्व केले आहे. सर्वसामान्यांचा, शेतकरी, शेतमजूर तसेच दिव्यांग, अनाथांचा नेता म्हणून ते लोकप्रिय आहेत.

### कार्यकर्ते लागले कामाला

या निवडणुकीत सुद्धा प्रहार चे कार्यकर्ते, पदाधिकारी, शेतकरी,शेतमजूर पूर्ण ताकतीने मैदानात उतरले आहे, आमदार म्हणून मतदारसंघात केलेली विकास कामे प्रत्येकाच्या घरोघरी पोहोचण्याकरता प्रहारचा प्रत्येक कार्यकर्ता रात्रीचा दिवस करीत आहे. या निवडणुकीत आमदार बच्चू कडू पाचव्यांदा विजय होऊन इतिहास रचणार यामध्ये तीळ मात्र ही शंका नाही असा विश्वास प्रहार कार्यकर्त्यांना आहे. शिवाय मतदारांचा कल सुद्धा बच्चू कडू यांनी केलेल्या सार्वत्रिक विकास कामांकडे असल्याचे दिसत आहे.

### 6700 कोटींच्या निधींची विकासकामे

अचलपूर मतदारसंघाच्या विकासासाठी तब्बल 6 हजार 700 कोटी रुपयांचा विकास निधी आ. बच्चू कडू यांनी उपलब्ध केला.अनेक विकासात्मक कामे त्यांनी मतदार संघात केली असून यामुळे मतदार संघ सुजलाम सुफलाम झाला आहे. पुढील पन्नास वर्षाच्या सिंचनाचे नियोजन झालेले आहे, मतदारसंघात कोणत्याही शेतकरी आपल्या ओलिताच्या शेतीपासून पासून वंचित राहणार नाही, या काटेकोर नियोजनातून सिंचन व जलसंधारणाचे नियोजनबद्ध अनेक विकास कामे सुरू आहे, केलेल्या नियोजन मतदारसंघातील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी सुद्धा बच्चू कडू यांच्या प्रयत्नाने प्राप्त झाला असून यामुळे देवस्थानांचा कायापालट व सौंदर्यीकरणाचे कामे टप्प्या टप्प्याने सुरू आहे. जनतेच्या घरकुलांचे प्रश्न, रोजगार आणि सर्व सामान्यांना भेडसावणारे प्रश्न यांची सोडवणूक करण्याचे प्रामाणिक प्रयत्न बच्चू कडू यांनी केले. लोकांच्या समस्यांचे निराकारण गावातच करता यावे, यासाठी 'राहुटी' हा उपक्रम राबवला, तो कमालीचा यशस्वी ठरला. यापुढेही अशाच आक्रमकतेने जनसेवा करण्याचा संकल्प बच्चू कडू यांनी केला आहे.

### लोकनेता म्हणून ओळख

आपली संघटना राजकारणासाठी नसून समाजकारणाची आहे असा आदेश त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिला. त्या अनुषंगाने आजही प्रहार पक्ष 80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण करत असल्याचे सांगतात. देशातल्या राजकारणात बच्चू कडू यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांच्या राजकीय करकीर्दीकडे मोठ्या आशेने बघितल्या जाते. दिव्यांग, रुग्ण, विधवा आणि शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नांवर काम करत असल्याने बच्चू कडुंची लोकनेता म्हणून ओळख आहे.

# हॉटेल एजेन्ट जॅकमध्ये दम मारो दम

## मालक, मॅनेजरसह दोन वेटरविरुध्द गुन्हा दाखल

### हुक्का पार्लरवर धाड



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 27 ) –** शहरातील प्रसिध्द तापडिया मॉल स्थित हॉटेल एजेन्ट जॅकमध्ये हुक्का पार्लरमध्ये दम मारो दम चा प्रकार सुरु राजापेठ पोलिसांनी रविवारी उघड केला. राजापेठ पोलिसांनी हॉटेल एजेन्ट जॅकमधून एकुण 8 हजार 570 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणात पोलिसांनी 27 ऑक्टोबर रोजी गिरीष लालचंद बत्रा (37, रा. फर्शी स्टॉप, अमरावती), अवेज शमीउल्ला खान (42, रा. विद्या कॉलनी, अमरावती), यश ज्ञानेश्वर वाघमारे (21) व योगेश विश्वनाथ रामेकर (22, दोन्ही रा. साईनगर) नामक आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

तापडिया मॉलमधील हॉटेल एजेन्ट जॅकमध्ये हुक्का पार्लर सुरु असल्याची गोपनिय माहिती राजापेठ पोलिसांना मिळाली होती.

त्यानुसार पोलिसांनी दुपारी 12 वाजताच्या सुमारास हॉटेल एजेन्ट जॅकवर धाड टाकली. त्यावेळी ग्राहक हुक्काचे दम मारताना दिसून आले. पोलिसांनी तेथे उपस्थित हॉटेल मालक, मॅनेजर व वेटरला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, ते ग्राहकांना विविध प्रकारच्या फ्लेवरचे हुक्का पॉट तयार करून देत असल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे पोलिसांनी हॉटेल चालक गिरीष लालचंद बत्रा (37, रा. फर्शी स्टॉप, अमरावती), मॅनेजर अवेज शमीउल्ला खान (42, रा. विद्या कॉलनी, अमरावती), वेटर यश ज्ञानेश्वर वाघमारे (21, रा. साईनगर, अमरावती) व योगेश विश्वनाथ रामेकर (22, रा. साईनगर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस निरीक्षक जयदत्त भंवर, राजापेठचे पोलिस निरीक्षक पुनित कुलट यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक दिनेश माणुसमारे, पोलिस हवालदार घरवाल, विनोद माहुरे, जिवत बांडे, संजय कडू यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### 8 हजार 570 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त

दरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून वेगवेगळ्या रंगाचे काचेचे पॉट, वेगवेगळ्या रंगाचे पाईप, अफजल पान रस हुक्काचे फ्लेवर असलेले पाकीट, वाईट रोस पान हुक्क्याचे फ्लेवर असलेले पाकीट व सोएक्स हुक्क्याचे फ्लेवर असलेले पाकीट असा एकुण 8 हजार 570 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला.

### अर्ध्या तासात घरात चोरी


**अमरावती –** येवदा पोलीस ठाणे हद्दीतील रामतीर्थ येथे राहणारे गणेश शंकरराव कडू (55) हे घराला कुलूप लावून एटीएममध्ये गेले होते. अर्ध्या तासात परत आल्यानंतर त्यांना अज्ञात व्यक्तीने घराचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेला मोबाईल व दागिने असा एकूण 23 हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याचे दिसले. गणेशच्या फिर्यादीवरून येवदा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अमरावती मतदारसंघातून पप्पू पाटील यांचे आज नामांकन

## महारॅली द्वारे मनसे करणार शक्ती प्रदर्शन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.27 )–** सदैव चर्चेत असलेल्या व राजकीय दृष्ट्या अतिशय महत्त्वपूर्ण असलेल्या अमरावती विधानसभा मतदारसंघातून यावेळी प्रथमच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पप्पू उर्फ मंगेश पाटील या तगड्या उमेदवारास उमेदवारी बहाल करीत राष्ट्रीय पक्षाच्या दिग्गज उमेदवारांपुढे मोठे आव्हान निर्माण केले असून ही निवडणूक अतिशय तुळशीची होणार असल्याचे एकंदर चित्र आहे. या मतदारसंघातील मनसे उमेदवार पप्पू उर्फ मंगेश पाटील हे सोमवार दिनांक 28 रोजी आपला नामांकन अर्ज दाखल करणार असून त्यानिमित्त महारॅली काढून ते शक्तिपदर्शन करणार आहे.



सोमवार दिनांक 28 रोजी सकाळी 10 वाजता गाडगे नगर स्थित गाडगे महाराज मंदिर परिसरातून नामांकन महारॅलीस प्रारंभ होणार आहे. तत्पूर्वी मनसे उमेदवार पप्पू उर्फ मंगेश पाटील हे गाडगे महाराज यांचे दर्शन घेऊन ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी एकत्र येणाऱ्या अमरावतीकर मतदारांपुढे आपली भूमिका विशद करतील, त्यानंतर नामांकन महारॅली पंचवटी चौक ,इरविन चौक, मालवीय चौक या प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करीत तहसील कार्यालय येथे पोहोचून तेथे समारोप होईल .रॅली दरम्यान पप्पू पाटील हे डॉ. पंजाबराव देशमुख, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करतील व त्यानंतर ते आपला नामांकन अर्ज दाखल करतील. या महारॅलीमध्ये सहभागी होऊन ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे करण्यात आले आहे.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# घड्याळाने वाजवले आमदार देवेंद्र भुयारांचे बारा!

## पोस्टर बॅनरवरुन अजित पवारांसह पक्षाचे चिन्हही हटविले

**विलास पाटिल**
**वरुड, ( दि.27 )** – आपण आहे तर पक्ष आहे, पक्षाबद्दल फक्त 'युज अँड थ्रो' इतका दृष्टीकोण असावा, असा विचार करणाऱ्या काही उमेदवारांना पक्षांनी अधांतरी ठेवत चांगलाच धडा शिकविला आहे. मेळघाट नंतर मोर्शी मतदारसंघातही पक्षाने ऐनवेळी हात वर केल्याने उमेदवाराची चांगलीच गोची झाल्याचे पहायला मिळत आहे. मोर्शी-वरुड मतदार संघाचे विद्यमान आमदार देवेंद्र भूयार यांना अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारी मिळणार असल्याचे चित्र असताना ऐनवेळी राष्ट्रवादीच्या घड्याळीने त्यांचे बारा वाजविल्याचे दिसत आहे, त्यामूळे उमेदवारी नामांकन दाखल करण्याच्या पुर्वसंध्येला म्हणजे रविवारी आ.भूयार यांच्या पोस्टर बॅनरवरुन अजित पवार व त्यांची घड्याळ गायब झाली.

विधानसभा निवडणुकीच्या नामांकन अर्ज भरण्याला केवळ दोन दिवस उरले असताना आमदार देवेंद्र भुयार यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाची उमेदवारी मिळण्याची शक्यता आता मावळली आहे. त्यामूळे कालपर्यंत चारचाकीतच प्रवास करणारे आमदार रविवारी सकाळी शहरात दुचाकीवर फिरताना दिसून आले. सन 2019 मध्ये अनपेक्षित निकाल लागून तत्कालीन जि.प.सदस्य देवेंद्र भुयार विधानसभेवर गेले. त्यांना तेव्हा जणू राजकीय लॉटरीच लागली. भारतीय जनता पक्षाचे तत्कालीन कृषीमंत्री डॉ.अनिल बोंडे यांना त्यांनी पराभूत करुन मैदान मारले. परंतू यात त्यांचे कर्तुत्व नव्हते. मोर्शी-वरुड मतदार संघातील काँग्रेसचे तेव्हाचे नेते माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख व स्वाभिमानी शेतकरी संघटना त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी होती. तेव्हा सर्वांचे एकच लक्ष होते, बोंडेंना पराभूत करणे. देवेंद्र भूयार आमदार झाले,



शेतकरी पुत्र आमदार आणि शेतकरी संघटनेशी जुळलेले असल्याने भूयार शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांना न्याय देतील. परंतू झाले वेगळेच आ.भूयारांच्या 'युज अँड थ्रो' पॉलिसीनुसार त्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेशी फारकत घेतली. नंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते म्हणून वावरू लागले. कालांतराने काँग्रेसचे नरेशचंद्र ठाकरे यांच्यासोबतही तू तू मैं मैं करून त्यांची साथ सोडली. केवळ हर्षवर्धन देशमुख माझ्या निवडीचे शिल्पकार आहे, असे म्हणत त्यांना जळी, स्थळी, पाषाणी भैय्यासाहेबच दिसायला लागले. अडीच वर्षानंतर महाविकास आघाडीचे सरकार कोसळले, शिवसेने पाठोपाठ राष्ट्रवादीचेही दोन तुकडे झाले, त्यांनी पुन्हा आपली 'युज अँड थ्रो' पॉलिसी उपयोगात आणत भैय्यसाहेबांसह शरद पवारांच्या राष्ट्रवादीलाही सोडले. आणि पुन्हा नविन पक्षाला बकरा बनवित अजित पवारच्या राष्ट्रवादीला जाऊन डिकले. महायुतीची जागा आणि आपला शत्रु भाजप महायुतीचा महत्वाचा मित्रपक्ष असे रसायन असतानाही, भूयारांनी अजित पवारांनाही आपली शिकार बनविण्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी सावजच शिकार झाले. महायुतीचा भाग होण्याचे स्वप्न रंगवित असताना राष्ट्रवादीची घड्याळ तर आपल्यासाठी 'मृगजळ' असल्याचे त्यांना ऐन उमेदवारी दाखल करण्याच्या तोंडावर त्यांना कळले, महायुतीकडून ही जागा भाजपकडे सोडण्यात येत असल्याचे स्पष्ट होताच इतरांचा 'गेम' करणारे आपण मात्र यावेळी आपलाच 'गेम' झाल्याचे लक्षात येताच त्यांनी आपल्या कालपर्यंत आपल्या मनात असलेल्या अजित पवारांना पोस्टरवर सुध्दा ठेवले नाही. परंतू राष्ट्रवादीच्या घड्याळीने आ.भूयारांचे वाजविलेले बारा जिल्हाभर चर्चेचा विषय ठरत आहे.

# मविआ चे उमेदवार सुनील खराटेंचे 29 ला नामांकन

## खा.अनिल देसाईसह तिन्ही पक्षांच्या नेत्यांची राहणार उपस्थिती

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.27 )** – बडनेरा विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी पुरस्कृत शिवसेना(उबाठा) पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे मंगळवार (दि.29) ला आपला नामांकन अर्ज दाखल करणार आहे.

ऑक्टोबर रोजी सकाळी 10 वाजता दाखल करणार आहेत. महाविकास आघाडीमध्ये समाविष्ट सर्वच पक्षाच्या स्थानिक नेत्यांसह हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत सुनील खराटे शक्तिप्रदर्शन करणार आहे. शिवसेनेचा बालेकिल्ला असलेला बडनेरा मतदार संघ काबीज करण्यासाठी शिवसेनेसह महाविकास आघाडी सज्ज झाली असून बडनेरा मतदार संघात परिवर्तनाच्या लढाईला यानिमित्ताने प्रारंभ झाला आहे.

नामांकन अर्ज दाखल करण्यापूर्वी सुनील खराटे यांच्या समर्थनार्थ साईनगर बेनाम चौक स्थित महेश भवन येथे शिवसेना नेते खा.अनिल देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच खा. बळवंत वानखडे, आ यशोमती ठाकूर, बबलू शेखावत विलास इंगोले ,माजी खा.अनंत गुढे, माजी आ. प्रदीप वडनेरे,शिवसेना




जिल्हा संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी, महानगरप्रमुख पराग गुढधे, प्रा.डॉ. हेमंत देशमुख, अनिल जळमकर व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व अन्य मित्रपक्षांचे वरिष्ठ पदाधिकारी यांच्या उपस्थितीत कार्यकर्ते व पदाधिकारी यांचा मेळावा पार पडेल व त्यानंतर तेथून दुचाकी रॅलीस प्रारंभ होईल. ही दुचाकी रॅली महेश भवन, समर्थ हायस्कूल रवी नगर चौक, प्रभात कॉलनी, बालाजी प्लॉट, मुधोळकर पेठ रोड, कवर नगर चौक, फरशीस्टॉप, दस्तुर नगर चौक, हरीगंगा ऑइल मिल, संताजी नगर रोड,रंगोली हॉटेल या मार्गाने मार्गक्रमण करीत राजापेठ स्थित मुख्य कार्यालय येथे दुचाकी रॅली चा समारोप होणार आहे. त्यानंतर सुनील खराटे हे प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालय येथे नामांकन दाखल करतील.

# बौद्ध समाजाला नाकारलेली उमेदवारी मविआ ला घातक!

## आठही मतदार संघात नकारात्मक परिणामाची शक्यता- डोंगरदिवे

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.27 )** – संविधान धोक्यात असल्याचे सांगत गेल्या लोकसभा निवडणुकीत बौध्द समाजाकडून महाराष्ट्रभर मतदानाची खैरात जमा करणाऱ्या महाविकास आघाडीने सध्याच्या विधानसभा निवडणुकीत एकाही बौद्ध प्रतीनीधीला उमेदवारी न दिल्याने जिल्ह्यातील राजकारणात बौद्ध समाजाचा बळी दिला असल्याची भावना निर्माण झाली आहे. यामूळे जिल्ह्यातील आठही मतदार संघात बौद्ध समाज वेगळा विचार करण्याच्या मानसीकतेत पोहचला असल्याचे मत माजी नगरसेवक विनीत डोंगरदिवे यांनी मांडले आहे.

डोंगरदिवे यांनी सांगितले की, एका अंदाजानूसार अमरावती जिल्ह्यात जवळपास 3 लाख 75 हजार बौद्ध मतदार आहेत. लोकसभा निवडणूकीत सर्वांच्या सहकार्याने बळवंत वानखडे यांना विजय प्राप्त झाला यात शंका नाही. परंतू दर्यापुर मतदार संघातील बळवंत वानखडे यांच्या रिक्त झालेल्या पदावर बौद्ध समाजाचाच हक्क असताना त्याऐवजी अल्पमतात असलेल्या हिंदु



अनु.जातीच्या व्यक्तीला उमेदवारी दिली. त्यामूळे खासदार बळवंत वानखडे यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाल्याची भावना बौद्ध समाजामध्ये व्यक्त होत आहे. जर रिक्त झालेल्या पदावर बौद्ध समाजाचा उमेदवार महाविकास आघाडी आणि महायुती देऊ शकत नसेल तर, बौद्ध समाजाने सुद्धा महाविकास आघाडीला व महायुतीला का म्हणून मतदान करावे? अशी चर्चा सर्वत्र सुरु आहे. याचे गंभीर परिणाम जिल्ह्यातील आठही मतदार सघामध्ये उमटतील असा सुर दिसून येत आहे.तर दर्यापुर मतदार संघात महाविकास आघाडीने हक्काच्या मतदारावर गदा आणू नये अन्यथा ही गळ्यात अडकलेली हड्डी बनू शकते असे सर्वत्र चर्चेतून बोलल्या जात असल्याचे विनित डोंगरदिवे यांनी सांगितले.

# दिव्यांगांना निवडणुकीच्या कामातून वगळावे

## महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे निवेदन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.27 )** – महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून निवडणूक आयोग निर्णय निर्देशानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना निवडणूक कामातून वगळण्यात यावे अशी मागणी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित, कार्याध्यक्ष चंद्रकांत मामनकर आणि इतर पदाधिकारी यांनी जिल्हाधिकारी काही दिवसांपुर्वी दिलेल्या निवेदनातून केली आहे. केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग यांनी दिव्यांगांना 12 मार्च 1997 च्या तसेच महाराष्ट्र शासन सा.प्र. वि. विभाग यांनीही 28 जून 1999 च्या पत्राच्या अनुषंगाने निवडणूक काम न देण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत. यावेळी याबाबत संघटनेचे राज्याध्यक्ष रवींद्र पाटील व राज्यसचिव परमेश्वर बाबर यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सर्व विधानसभा मतदारसंघ अधिकारी यांना दिव्यांगांना निवडणूक काम देऊ नये बाबत केंद्र व राज्य निवडणूक आयोग तसेच महाराष्ट्र शासनाचे सर्व पत्रके तसेच अपंग व्यक्ती हक्क अधिनियम कायदा 2016 मधील तरतुदी प्रत्यक्ष भेटीत निवेदनाद्वारे लक्षात आणून दिले आहेत.

नुकत्याच मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये काही दिव्यांग कर्मचारी व दिव्यांग शिक्षक यांची नेमणूक करण्यात आली होती. निवेदन दिल्यानंतर त्या सर्व रद्द हि करण्यात आल्या होत्या.

येत्या विधानसभा निवडणुकीसाठी सुद्धा काही दिव्यांग बंधू-भगिनींना निवडणूक कामी आदेश दिले असून ते त्वरित रद्द करावे अशी मागणी संघटनेचे अमरावती जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित, कार्याध्यक्ष चंद्रकांत मामनकर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राजू डांगे, सदस्य केशव खरडकर, उर्दू प्रतिनिधी अफसर खान, नाझीम अली, अब्दुल खलील , मुस्ताक अहमद, मंगेश खंडारे व इतर संघटना पदाधिकारी व दिव्यांग बांधवांनी केली.

### वलगावातील एटीएममधून बॅटऱ्यांची चोरी

**अमरावती** – वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुना बसस्थानक येथील विदर्भ रिजनल इंडिया वन कंपनीच्या एटीएममधून अज्ञात चोरट्याने 24 हजार रुपये किमतीच्या तीन बॅटरी व डायलरचे लॉक चोरून नेले. मुस्तफा इक्बाल सैफी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# निवासी शाळेतील विद्यार्थी राज्यस्तरावर

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे ( दि. 27 )** – क्रीडा व युवा संचनालय व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती यांचे तर्फे आयोजित शासकीय विभागस्तर 5 हजार मीटर चालणे स्पर्धा 24 ऑक्टोंबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ येथे संपन्न झाली. यात चांदूर रल्वे तालुक्यातील तुळजापुर येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा येथील सतरा वर्षे आतील मुलांमध्ये समय सजून पवार हा मुलगा 5 हजार मीटर चालणे या स्पर्धेमध्ये विजयी होऊन राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. त्याला शाळेतील क्रीडा शिक्षिका ममता दिवाण व मार्गदर्शक अविनाश नवघरे (अधीक्षक) यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडूंचे अभिनंदन व पुढील स्पर्धेकरिता प्रादेशिक उपायुक्त समाज



कल्याण, अमरावतीचे सुनील वारे व सहाय्यक आयुक्त समाज राजेंद्र जाधवर तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका किरण मेश्राम व शाळेतील शिक्षक व इतर शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.

# आज वसु बारसने दिवाळीची सुरूवात

## गोपालक करणार गाई, वासराचे पुजन

**मारोती पाटणकर**
**चुरणी,( दि.27 )–** उद्या (दि.27) वसु बारस, खऱ्या अर्थाने दिवाळीला सुरुवात वसु बारसपासूनच होते. गोपालका आजच्या दिवशी गाय आणि वासराची पुजा करुन दिवाळी साजरी करायला सुरवात करतात.

आनंदाचा, उत्साहाचा, मांगल्याचा सण म्हणजे दिवाळी. दरवर्षी सर्वजण अतुरतेनं दिवाळी सणाची वाट पाहत असतात. दिवाळीचा पहिला दिवस हा गाई वासरांची दिवाळी म्हणून ओळखला जातो. भारतीय संस्कृतीत गायीला मातेचा दर्जा देण्याहत आला आहे. तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वसुबारस या दिवशी गाय आणि तिच्या वासराची पूजा केली जाते. गोवत्स द्वादशी म्हणजेच, वसुबारस. अश्विन कृष्ण द्वादशीस वसुबारस साजरी केले जाते. गाई-गुरांबददल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. वसु म्हणजे द्रव्य अर्थात धन त्यासाठी असलेली बारस म्हणजेच, द्वादशी म्हणून या दिवसाला गोवत्स द्वादशी असंही म्हटलं जातं. भारतीय संस्कृतीत गायीला मातेचा दर्जा देण्यावत आला असून, ती पूजनीय मानली गेली आहे. समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या, अशी कथा आहे. त्यातल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून वसुबारस हे व्रत करण्यात येतं. या दिवशी सौभाग्यवती स्त्रिया सकाळी अथवा सायंकाळी सवत्स गायीची पूजा करुन गोडधोड पदार्थ गायीला खाऊ घालतात. वसुबारसच्या दिवसापासून अंगणात रांगोळी काढून दिवाळी सणाची सुरुवात होते. या दिवशी तेलातुपात तळलेले पदार्थ आणि गायीचे दूध, तूप व ताक खात नाहीत. उडदाचे वडे, भात व गोडधोडाचे पदार्थ करून ते गायीला खाऊ घालतात.

घरात लक्ष्मी देवीचे आगमन व्हावे या हेतूनेही या दिवशी वासरु असलेल्या गायीची पूजा करण्याची पद्धत आहे. घरातील सवाष्ण बायका गायीच्या पायावर पाणी घालतात. हळद-कुंकू आणि अक्षता वाहतात. ज्यांच्या घरी गुरे, वारसे आहेत, त्यांच्या घरी पुरणाचा स्वयंपाक केला जातो. मग गाईला निरांजनाने ओवाळून केळीच्या पानावर पुरणाचा नैवेद्य खायला दिला जातो. समुद्र मंथनातून उत्पन्न झालेल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे. ह्या दिवशी हिंदू परंपरेनुसार, गहू, मूग खात नाहीत. स्त्रिया बाजरीची भाकरी आणि गवारीच्या शेंगाची भाजी खाऊन उपवास सोडतात. भरपूर कृषी उत्पादन व्हावं, आपल्या मुला-बाळांना चांगले आरोग्य मिळावं आणि सुख लाभावं म्हणून वसुबारसची पूजा केली जाते. या दिवशी संध्याकाळी घरातील तुळशीपुढे आणि दारात, परिसरात दिवाळी सणाच्या प्रारंभानिमित्त पणत्या लावून रोषणाई करण्याची पद्धत आहे.



### वसुबारस सणाचे काही नियम

वसुबारण सणाच्या दिवशी गहू, मूग खात नाही. महिला या दिवशी दिवसभर उपास करतात. बाजरीची भाकरी आणि गवारीच्या शेंगांची भाजी खाऊन उपास सोडतात. या दिवशी दूध, दुधाचे पदार्थ, तळलेले तसेच तव्यावर बनवलेले पदार्थ खात नाहीत, अशी लोकमान्यता असल्याचे सांगितले जाते.

### यंदा एकादशीलाच साजरी होणार वसुबारस

**नितीन दुर्बुंडे**
**पथ्रोट,( दि.27 )–** वर्षभरात येणारे सण-उत्सवांचा राजा मानल्या गेलेल्या दीपोत्सवाची सुरुवात वसुबारसने केली जाते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथे पशुधनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतीय संस्कृतीत गाईला मातेचा दर्जा देण्यानत आला असून, ती पूजनीय मानली गेली आहे. तिच्याणप्रतीच्यास कृतज्ञतेतून वसुबारस या दिवशी गाय आणि तिचे वासरू यांची पूजा केली जाते. यंदा एकादशीलाच वसुबारस साजरा केला जाईल, यंदा सोमवार ,28 ऑक्टोबर रोजी अश्विन कृष्ण एकादशीला वसुबारस आणि रमा एकादशी आहे, त्यामुळे यंदाच्या वसुबारसला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे . समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या होत्या. त्यातून नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हा सण साजरा केला जातो, अशी मान्यता आहे. वसुबारस या शब्दातील वसू म्हणजे धन (द्रव्य), त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी. या दिवशी जे व्रत करतात त्यात सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सकाळी अथवा सायंकाळी सवत्स गायीची पूजा करतात व पुढील मंत्राने तिची प्रार्थना करतात–

**ततः सर्वमये देवी सर्वदेवैरल-ते 7**
**मातर्ममाभिलषितं सफलं कुरू नन्दिनि 77**

हे सर्वात्मक व सर्व देवांनी अलंकृत अशा नंदिनी माते, तू माझे मनोरथ सफल कर, असा याचा अर्थ आहे. समुद्रमंथनातून उत्पन्न झालेल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे.

# ग्रामिण पोलिसांचे ऑपरेशन ऑल आऊट

- गुन्हेगारांची आश्रयस्थाने, तडीपार, पकड वॉरंटमधील आरोपींची तपासणी
- अमरावती ग्रामिण पोलिसांची विधानसभेच्या अनुषंगाने मोहिम

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 27 )** – आगामी सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिसांनी ग्रामिण भागात ऑपरेशन ऑल आऊट राबविल्याने गुन्हेगारांचे धाबे दणाणले होते. पोलिसांनी गुन्हेगारांची आश्रयस्थाने, तडीपार आरोपी, पकड वॉरंटमधील आरोपी यांची तपासणी केली.

गुन्हेगारांवर वचक निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्याच्या दृष्टीने अमरावती ग्रामीण पोलिसांनी 27 ऑक्टोंबर रोजी रात्री 12 वाजतानंतर पहाटे 5 वाजेपर्यंत ऑपरेशन ऑल आऊट राबविले. सदर मोहिमेत पोलिसांनी जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर, जिल्हा, राज्याचे सिमेवर सशस्त्र नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली तसेच सराईत गुन्हेगारांची तपासणी केली. त्यामुळे गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली होती. अमरावती ग्रामीण हद्दीतील धाबे, हॉटेल, लॉजेस यांची सुध्दा कसुन चौकशी करण्यात आली आहे. अवैध दारु, जुगार, गुटखा व अमंली पदार्थ अशा ई.) अशा प्रकारचे अवैध व्यवसाय करणारे इसम चिन्हाकींग करून त्यांची तपासणी केली. सदर मोहीमेदरम्यान अमरावती ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, सर्व पोलीस उप अधिक्षक तसेच सर्व प्रभारी अधिकारी असे एकुण 73



पोलीस अधिकारी व 488 पोलीस अमंलदार यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. अचानकपणे सुरू करण्यात आलेल्या सदर मोहीमेमुळे समाजकंटक व गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांवर चांगलाच वचक बसला असुन अशा प्रकारच्या मोहीम सतत राबविण्यात येणार असल्याचे अमरावती ग्रामीण पोलीसांनी दिली. सदर मोहीमेदरम्यान अभिलेखावर फरार म्हणून घोषीत असलेला अशोक उर्फ मिनेश गुलाबराव इंगोले (वय 29 वर्ष, रा आंबेडकर नगर, अशोक नगर, यवतमाळ) याला अटक करण्यात आली. परतवाडा, अंजनगाव सुर्जी, वरुड पोलिसांनी आरोपी शेख सादीक उर्फ चिचि शेख सलीम (वय 20 वर्ष, रा. खिरणी बगीचा, परतवाडा), राकेश गणेश शाहु (30 वर्ष, रा. अजीतपुरा, अंजनगाव सुर्जी) व दिलीप भिशन सिरसाम (वय 38 वर्ष, रा. तिवसा घाट, वरुड) यांच्याविरुध्द शस्त्र अधिनियमान्वये कार्यवाही करण्यात आली. त्याचप्रमाणे रात्री दरम्यान ईक्बाल खान मेहबुब खान (40, रा. पाण्याचे टाकी जवळ, मुघलाईपुरा, परतवाडा) हा संशयास्पदरित्या फिरताना दिसला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन, त्याच्याविरुध्द कलम 122 महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये गुन्हा नोंदविला. तसेच पकड वॉरंटमधील एकुण 16 आरोपींना अटक करण्यात आली. या ऑल आउट ऑपरेशन दरम्यान शस्त्र अधिनियमान्वये एकुण 3 आरोपीतांवर कार्यवाही करुन जेरबंद करण्यात आले आहे. ऑल आउट ऑपरेशनमध्ये ग्रामिण भागातील विविध ठिकाणी अवैध धंद्याविषयी 23 केसेस करण्यात आल्या. यात 1 लाख 85 हजार 260 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले. तसेच अचलपुर, परतवाडा, ब्राम्हणवाडा थडी, वरुड येथे गुटखा कारवाई एकुण 5 केसेस करण्यात आल्या असून, यात 90 हजार 800 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.